# चैतन्य लहरी

मराठी

जानेवारी-फेब्रुवारी २०१६





# या अंकात


**तिलांजली** ...४

(संक्रांती पूजा, मुंबई, १४/१/१९८५)

**सहजयोगबद्दल सगळ्यांना सांगायचे** ...८

(सार्वजनिक कार्यक्रम, मुंबई, २७/५/१९७६)

**आत्मानुभव** ...१८

(सेमिनार अँड मिटिंग, औरंगाबाद, ९/१२/१९८७)


या दिवशी आपण लोकांना तिळगूळ देऊन गोड, गोड बोलायला सांगतो. आपण दुसऱ्यांना बोलायला सांगतो पण स्वत:लाही सांगितलेलं बरं! कारण दुसऱ्यांना सांगणं फार सोपं आहे. तुम्ही गोड, गोड बोला आणि आम्ही अद्वातद्वा बोलू. या अशा त-हेच्या प्रवृत्तींनी आज कोणीच गोड, गोड बोलत नाही असं दिसतं.

प.पू.श्रीमाताजी, राहुरी, १४.१.१९८७



आता तुम्हा लोकांना सांगायचं म्हणजे असं की इतकी मंडळी आपल्याकडे पाहुणे म्हणून आली आणि त्यांना तुम्ही सगळ्यांनी एवढ्या ह्याने बोलावलंत आणि त्यांची इतकी व्यवस्था केली. त्याबद्दल कोणीही, काहीही मला असं दाखवलं नाही की, मला अशी मेहनत पडली किंवा मला त्रास झाला. आणि मुंबईकरांनी विशेष करून फारच मेहनत केलेली आहे. त्याबद्दल तुम्हा सर्वांच्या तर्फे, ह्या सर्वांच्या तर्फे मला असं म्हणावं लागेल, की मुंबईकरांनी फार आघाडी मारलेली आहे. पण जे ह्यांना सांगते तेच आपल्याला सांगते. आज आपण तिळगूळ देतो. कारण सूर्यापासून जे त्रास आहेत ते आपल्याला होऊ नयेत.

पहिला त्रास म्हणजे, सूर्य आला म्हणजे मनुष्य चिडचिडा होतो. एक दुसऱ्याला उणंदुणं बोलतो. त्याच्यामध्ये अहंकार बळावतो. सूर्याच्या खाली राहणाऱ्या लोकांना फार अहंकार आहे. म्हणून अशा लोकांनी एक गोष्ट लक्षात ठेवायची, हा मंत्र आहे, की 'गोड गोड बोला.' तिळगूळ घेतल्याबरोबर अंगात गरमी येते आणि लागले वसकन् ओरडायला. म्हणजे झालं! अहो, आत्ताच तिळगूळ दिला. निदान तेवढं तरी तुम्ही गोड बोला माझ्याशी. ते सुद्धा

# तिलांजली

मुंबई, १४ जानेवारी १९८५

जुळत नाही. तिळगूळ घेतला नी लागले ओरडायला. कसला तिळगूळ तुमचा, फेका तिकडे. तेव्हा ह्या ह्याच्यामध्ये आपण असं ठरवून घ्यायचं, की ही पार सुसंधी आहे. माताजी आल्या आणि माताजींनी आम्हाला कितीही सांगितलं ते आमच्या डोक्यात जाणार नाही. जर आमच्या डोक्यात गरमी असली तर काहीही जाणार नाही. ही गरमी निघायला पाहिजे. आणि ही गरमी आपल्यामध्ये कुठून येते? तर ती अहंकारामधून येते.

पूर्वीच्या काळी जेव्हा आम्ही सहजयोग सुरू केला, तेव्हा सगळ्यांच्या भांडाभांडी असायच्या. म्हणजे इथपर्यंत की डोकी फोडली नाही हे नशीब! बाकी डोकी शाबूत आहेत सगळ्यांची आता. पण भांडणं, कुणाचं कशावरून भांडण, तर कुणाचं कशावरून भांडण. अर्धे पळाले, अर्धे राहिले. म्हटलं सहजयोग काही व्हायचा नाही. कारण एक आला कामाला, दोन दिवसाने पळाला. दुसरा आला तो तीन दिवसाने पळाला. तर अशी स्थिती होती. ह्या पळापळीतच आपण सहजयोग बसवलेला आहे. पण त्याला मुख्य कारण एकच, की तुम्हाला इच्छा असायला पाहिजे की, ‘काहीही असलं तरी आम्ही परमेश्वराला भेटायला आलोत. आम्हाला परमेश्वराचे आशीर्वाद हवे. आम्हाला परमेश्वरी तत्त्व जाणायचंय. आम्हाला जगातल्या ह्या ज्या सर्व काही गोष्टी आहेत, ज्याने सगळ्यांना ताप आणि त्रास होतोय त्यांना नष्ट करायचंय.’ तेव्हा इथे भांडाभांडी करून चालणार नाही. ह्या अहंकारामुळे इतके त्रास सबंध जगामध्ये झालेले आहेत! आता सहजयोगामध्ये मात्र ह्याला पूर्णपणे तिलांजली दिली पाहिजे. आणि तिलांजली म्हणजे तिळांची अंजली. म्हणजे हातात हे तीळ घेऊन त्याची अंजली तुम्ही देऊन टाकावी. म्हणजे आता ह्याच्यापुढे आपण काही खोटं करणार नाही. रागवणार नाही.

एकवेळा करून बघा. एक वेळेला करून बघायचं! न रागवता किती तरी गोष्टींना मनुष्य समेटू शकतो. किती तरी गोष्टींचा सामना करू शकतो आणि किती तरी गोष्टींकडे नुसते लक्ष न दिल्यामुळे सबंध काही उत्तरच त्याचं मिळालेले आहे, सबंध त्यांचे जे काही प्रश्न आहेत ते सुटलेले आहेत, असं तुमच्यासमोर एखादं दृश्य येईल. तेव्हा कोणत्याही गोष्टीला आपण अत्यंत जर महत्त्व दिलं, तर आपण त्याच्यामध्ये तामसिक स्वभावाचे झालो. असं म्हणता येईल. तामसिक म्हणजे काय? जो मनुष्य, जे लहानसं असेल त्याचं खूप मोठं करतो. म्हणजे एखादी बाई, आता तिचा नवरा आजारी. ‘माझा नवरा आजारी, माझा नवरा आजारी.’ कबूल. पण तू आहेस ना! तुझी तब्येत ठीक आहे नां!

तुझ्याबद्दल काय? ते काही नाही. पण तो तरी म्हणा नवरा आहे, ते तरी महत्त्वाचं आहे. पण एक लहानशी गोष्ट घेऊन बसायचं. त्याचा गवगवा करायचा. दुसऱ्यांना हैराण करायचं. त्रास द्यायचा. ही जी आपल्याकडे एक पद्धत आहे, त्याला कारण असं आहे, की आपल्यामध्ये क्षुल्लक गोष्टींचं महत्त्व जास्त आहे आणि मोठ्या गोष्टींकडे लक्षच नाही.

त्या लोकांना काय, मोठं आणि लहान सगळं बरोबरच आहे. काही समजत नाही त्याच्यातलं. पण तुम्हाला समजलं पाहिजे. कारण आपलं जे काही आहे एवढं मोठं, हा जो काही वारसा मिळालेला आहे, फार मोठा आहे. तेव्हा वारसा मिळाला. आम्ही ह्या योगभूमीत जन्माला आलो. ह्या योगभूमीत आम्ही आल्यावर आम्ही काय मिळवलं? हजारो वर्षांच्या तपश्चर्येनंतर म्हणतात हिंदुस्थानात जन्म होतो आणि त्याच्या हजार वर्षानंतर महाराष्ट्रात होतो. आता रस्त्यात झिंगत लोक पाहिले, की मला समजत नाही, महाराष्ट्रातले आहेत की कुठले आहेत? म्हणजे किडे कसे जन्माला आले ते समजत नाही. आता तुम्ही सहजयोगी झालात. कारण तुमची पूर्वजन्माची तपश्चर्या आहे. आज ती फळाला आली. पण त्याचा अर्थ असा नाही, की बाकीची सगळी ही तपश्चर्या ह्या जन्मात आता माताजींनी करायची.

ह्या जन्मातली पहिली तपश्चर्या म्हणजे आपापसात गोड बोललं पाहिजे. प्रेमाने वागलं पाहिजे. तोडून नाही बोलायचं. पहिली गोष्ट. म्हणून आज पहिला दिवस आपला पूजेचा आपण सुरू केलेला आहे. त्यादिवशी आपण सर्वांनी गोड बोललं पाहिजे आणि गोडीत राहिलं पाहिजे. कारण गोड बोलणं हे फार सोपं काम आहे. रागावणं तर त्याहून कठीण आणि मारणं तर जमतच नाही माणसाला. तेव्हा कशाला कठीण कामं करायची. सरळ गोड बोललं की झालं. आता आपल्याकडे पुष्कळ 'गोडबोले' वगैरे असतात. मी असा विचार केला की ह्यांच्या फॅमिलीतच लोक गोड बोलत असतील वगैरे. तर खरोखर ते लोक गोड बोलत असत. पण ते गोड बोलून दुसऱ्यांचे गळे कापत. मग म्हटलं हा काय प्रकार! 'अहो,' म्हणे, 'पूर्वी आमच्याकडे लोक गोड बोलत असत. त्यांच्या गोड बोलण्यामुळे लोकांनी त्यांचा फायदा उचलला. आता आम्ही गोड बोलतो, पण आम्ही गळेही कापतो.' म्हटलं, 'कशाला? हे काही तुम्ही चांगल शिकले का? हे काही तुमचं भलं केलं का? त्याच्या वर गेलात का तुम्ही?' ती मंडळी बरी होती जी गोड बोलायची. ती आरामात राहिली. संतोषात राहिली. दोन माणसांबरोबर तुमची भांडणं झाली उद्या आणि तुम्ही त्यांचे गळे कापले. तर तुम्ही मिळवलं काय? आपण मिळवलं काय हे बघितलं पाहिजे.

तेव्हा आजचा दिवस विशेष सणाचा. सगळ्यांना अत्यंत साजरा असा आहे. ह्यावेळेला मला तरी काही कडू बोलायचं नाही आणि सगळ्यांचं मन राखून मी सांगते, की मी एवढी काळजी घेत असते, कुठून असं नाही झालं पाहिजे, की लोकांना वाईट वाटेल किंवा काय होईल. आता काही लोक येतात की माझ्या अंगाला पटकन हात लावतात. आता त्याने त्रास होतो मला. तसं करायचं नसतं. पण सांगायचं कसं? मग सहन करते मी! जाऊ दे बाबा, काय करता आता? कसं, त्याला वाईट वाटेल. असं पुष्कळ सहन करावं लागतं. मला काही हरकत नाही, हे सहन करण्याची. कारण त्याला दुखवलं तर त्याला दु:ख वाटेल. कशाला? तेवढं दु:ख मी सहन करू शकते. आपल्यामध्ये जेवढी शक्ती असते ती दुसऱ्यामध्ये नाही ही जाणीव असल्यामुळे त्याचं काही वाटत नाही.

त्या प्रेमाच्या बाबतीतसुद्धा तसंच. आपल्या जर प्रेमाची शक्ती जास्त आहे, आणि दुसऱ्याची कमी आहे, तर आपण मोठे की ते दुसरे. असा एक सारासार विचार जर घेतला, तर आपण सहजयोगी आहोत आणि आपल्याला आईने प्रेमाची शक्ती दिली आहे. तेव्हा आम्ही त्यांच्यापेक्षा मोठे आहोत. तेव्हा ते काहीतरी बोलले तर आपलं काय जातं त्याच्यामध्ये. त्यांच्याशी एवढी भांडाभांडी आणि रागराग करण्याची काय गरज. हळूहळू तुमचा स्वभाव शांत झाला. तुमच्या चेहऱ्यावर तेज येणार. इतकेच नव्हे तर चार लोक तुमच्या आसपास आले तर तुम्हाला बघून म्हणतील की हे शांत आहेत. पण शांतपणाचा हा अर्थ नव्हे, की तुम्ही कोणी जोडी मारले तरी खा. असं मुळीच नाही. फक्त सहजयोग्यांसाठी सांगितलेले आहे, की तुमच्या तोंडात कोणी थोबाडीत मारली तर दुसरे थोबाड पुढे करा. फक्त सहजयोग्यांसाठी. इतर लोकांसाठी नाही. इतर लोकांनी एक थोबाडीत मारली, तर तुम्ही चार मारा असं मी सांगेन. कारण त्यांची भुतं असतील तर निघून जातील. पण आपापसामध्ये, सहजयोग्यांच्यामध्ये तुमचं बोलणं शुद्ध असायला पाहिजे आणि प्रेमळ असायला पाहिजे. ही फार आवश्यक गोष्ट आहे. सगळ्यांनी प्रेमळपणे आपापसात बोलणं केलं पाहिजे आणि जो बाहेरचा मनुष्य आहे, त्याच्यावर तुम्ही असे बोलले तर मला काही हरकत नाही. पण जो आपला आहे, हा सहजयोगी सगळा माझ्या अंगात आलेला आहे. एक एक मनुष्य माझ्या शरीरात गेलेला आहे. तुम्ही जर एकदुसऱ्यांना लाथा मारल्यात किंवा शिव्या दिल्यात, त्या मलाच तुम्ही शिव्या देता असं समजलं पाहिजे. एकमेकांची ओळख असायला पाहिजे आणि वागतांना आपल्यामध्ये सोज्वळता असायला पाहिजे. काहीतरी बहकल्यासारखं एखाद्याच्या मागेच लागायचं किंवा काहीतरी बहकल्यासारखं बडबडत रहायचं किंवा बोलत रहायचं. पुष्कळांना गाणं म्हणण्याची टूम असते. कोणी, काही कविताच वाचत बसेल, तर कोणी गाणंच म्हणत बसेल, कोणी काय.. असं नाही. जे बरोबर, व्यवहारी आणि सौंदर्यमय असेल ते केलं पाहिजे. वागण्यामध्येसुद्धा सुंदरता असायला पाहिजे. आणि आपण आता जेव्हा सगळे दागिने वगैरे करतो आईसाठी, किती सुंदर असतात. पण तुम्हीच माझे दागिने आहात. तुम्हालाच अंगावर मी लेवून घेतलेले आहे. त्या दागिन्यांमध्ये जर स्वच्छता नसली, किंवा त्याच्यामध्ये जर अशुद्धता म्हणजे त्याच्या अंगातले जे मुख्य गुण आहेत, तेच नाही त्याच्यात. सोन्याचं जर सोनं नसलं, सोन्याच्या जागी पितळ असलं, तर त्याला काय अर्थ आहे? तसंच तुमचं आहे. तुमच्या अंगातला मुख्य जो धातू आहे, तोच जर खोटा असला, तर त्याला घालून मी कुठे मिरवायचं?

तेव्हा तुम्हीच माझं लेणं, तुम्हीच माझं भूषण आहात. तुम्हीच मला भूषवून दिलेले आहे. मला कोणत्याच दुसऱ्या भूषणाची गरज नाही. असं मी तुमच्याजवळ आता फार विनवून सांगते, की बोलतांना वगैरे एकंदरीत मुलांच्या बाबतीत किंवा कोणाच्याही बाबतीत अत्यंत समजूतदारपणाने अत्यंत नम्रपणाने आणि सावकाशपणे सगळं कार्य झालं पाहिजे. कोणावरही जबरदस्ती, जुलूम किंवा घाई वगैरे करण्यात काही अर्थ नाही. अशा रीतीने एक दिवस असा येणार आहे, की सगळं जग तुमच्याकडे बघून आश्चर्यचकित होईल. 'अहो, ही मंडळी कुठली? हे कुठले लोक? हे कोण आले?' मग कळेल, की हे स्वर्गातले दूत आलेत. सर्व जगाला सांभाळण्यासाठी, सर्व जगाला यश देण्यासाठी, सर्व जगाला परमेश्वराच्या दारात नेण्यासाठी, हे परमेश्वराने पाठवलेले दूत आहेत. अशा सर्व दूतांना माझा नमस्कार!

मुंबई, २७ मे १९७६



# सहजयोगा बद्दल सगळ्यांना सांगायचे

सहजयोगावर एका सहजयोग्याने म्हंटले आहे की, ‘माताजी, तुम्ही आधी कळस मग पाया देता, आधी तुम्ही आमचा कळस बांधता.’ आणि खरोखर ही गोष्ट खरी आहे. म्हणजे समाधीला आत्तापर्यंत साधारणपणे जे काही लोकांनी केलं, मेहनत केली वगैरे वगैरे, योग म्हणा, हठयोग म्हणा, काही राजयोग म्हणा, जे काही केलं असेल ते, अर्थात त्याच्यातले काही खरे आणि काही खोटे असे सगळे मिळून त्या लोकांनी जे काही साधलं किंवा केलं, ती पद्धत म्हणजे ज्याला द्राविडी प्राणायाम म्हणतात, त्याच्यापेक्षा जास्त जबरदस्त त्रास आहे आणि ते काढायचं, तर त्याला एक पुराण लागेल सगळं काही सांगायचं म्हटलं. अर्थात् एक पुस्तक पातंजली योगशास्त्र एवढं मोठं आहे. ते एक हं मात्र. बाकी अनेक असतील अशी. आणि पुष्कळ असे शास्त्र वगैरे लिहिले गेले, की मनुष्याने अध्यात्म कसा घडवून आणायचा आणि अध्यात्माने वर कसं यायचं आणि उंची कशी गाठायची, वगैरे वगैरे अनेक पुराणं आपल्याकडे लिहिली गेलेली आहेत. त्यापैकी काही खरी आहेत, काही खोटी आहेत. काही घोटाळे आहेत आणि काही म्हणजे मूर्खपणा पण आहे. त्यात कारण असं, की जे शोधणारे होते, ते मुळात आंधळे होते. पण शोधता शोधता जेव्हा त्यांना सापडलं, तेव्हा डोळस झाले आणि डोळस झाल्यावर आम्ही आंधळेपणातून हे सगळं काही मिळविलेले आहे, तेव्हा तसंच सगळ्यांनी मिळवावं किंवा तसेच मिळेल. अशा पद्धतीने त्यांची मांडणी केली. ते बरोबरच आहे. त्यांच्या दृष्टीने ते बरोबर आहे.

आता असं आहे की जो मनुष्य बैलगाडीतून नेहमी प्रवास करतो, त्याला एरोप्लेनच्या प्रवासाची काय कल्पना येणार! कितीही कितीही कल्पना केली तरी त्याला काय कल्पना येणार? तसंच आहे आमच्या या सहजयोगाचं! अध्यात्मामध्ये ज्यांनी नुसतं आपल्या तंगड्या तोडल्या, डोक्यावर उभे राहिले वर्षानुवर्ष. श्वासोच्छवास घेऊन आणि काय काय कल्पना केल्या, त्यांना सहजयोगामध्ये माताजी आता बोटाच्या सहाऱ्यावरती तिथे पोहोचवतात कशा आणि करतात कशा? यावरती जर आश्चर्य झालं तर त्याच्याबद्दल काही वाईट वाटून घेण्यासारखं नाही.

समाधीमध्ये तीन प्रकारच्या समाधी त्यांनी सांगितलेल्या आहेत. पैकी पहिल्यांदा ते म्हणतात, ही सगळी मंडळी हं, मी नाही म्हणत, हे लोक म्हणतात, की आधी सालोक्य समाधी होते. सालोक्य समाधीमध्ये माणसाला दिसतं. आता दिसणार कसं? दिसतं, म्हणजे साक्षात् तुम्हाला गणेश दिसतो. नंतर तुम्हाला पुढे गेलं की कुंडलिनी दिसते. त्याच्यापुढे तुम्ही गेलात तर तुम्हाला विष्णू-लक्ष्मीचं दर्शन होतं. ही गोष्ट खरी आहे. सालोक्य समाधी जेव्हा माणसाला दिसते, तेव्हा त्याला असं दिसतं.

परवा मी तुम्हाला असं सांगितलं आहे, की दोन शिड्यांवरती पाय देऊन एक मनुष्य धडपडत धडपडत चालला होता. शिड्या नाहीत. शिड्यांपेक्षा म्हणा, भिंती आणि त्या भिंतीवर एक पाय इकडे दिला आणि एक पाय तिकडे दिला. आणि मधोमध जे काही आहे ते त्याला दिसतंय. पण त्याच्यामध्ये तो नाही. जी वस्तू तुम्हाला दिसते त्याच्यामध्ये तुम्ही नसता. बाहेरून दिसणाऱ्या ही बिल्डींग दिसेल. पण इथे (आत) असेल तर तुम्हाला बिल्डींग दिसणार आहे का? मग शेवटी धडपडत धडपडत तुम्ही असे वर चढत गेलात तर एका स्थितीला पोहोचल्यावर, एका दशेत पोहोचल्यावर तुम्ही अगदी थकून तिथे गळून पडता. आणि तिथे जाऊन पडल्यावर तुम्ही त्या सर्व लोकांच्याजवळ आल्यासारखं तुम्हाला वाटतं. त्याठिकाणी सामीप्य अशी समाधी घडते. म्हणजे तुम्हाला असं वाटतं की कृष्ण इथे उभा आहे, आपल्या शेजारी. कधी वाटतं, इकडे राधा आली आहे. कधी दिसतं तुम्हाला, साक्षात्, साईबाबा बसलेले आहेत. पण तरीसुद्धा तुम्ही तिथे नाहीत, जिथे ते आहेत. सामीप्य स्थितीतसुद्धा तुम्ही तिथे नाही जिथे ती मंडळी आहेत. त्यामुळे तुम्ही ह्या विचारात असता की, 'बुवा, ते आले आमच्याकडे आणि त्यांनी आमचं हे कार्य केलं. आमच्या गोवऱ्या थापून दिल्या विठ्ठलाने.' खरी गोष्ट आहे, खोटं नाही. पण तुम्ही विठ्ठलाच्या हृदयात नाही गेलेले. त्याच्यातलं सौंदर्य तुम्ही पाहिलेले नाही. गोवऱ्या थापून दिल्या तर काय झालं? काय विशेष घडलं? पण त्यावेळेला ती स्थिती होती की गोवऱ्या थापायच्या होत्या, त्यांनी त्या थापल्या, असं समजायचं. त्यावेळेला ही स्थिती नव्हती की हृदयामध्ये स्थान द्यायचं. तुम्हाला दर्शन घडले, कबूल. दर्शन हे घडायला पाहिजे. जर त्यावेळेला दर्शन घडले नसते तर लोकांचा परमेश्वरावर विश्वास नसता बसला. म्हणून दर्शनं दाखवली. पण काळ बदलतो नां! आज तो समय नाहीये. वेळ बदललेली आहे. आणि ह्या वेळेला काय झालं पाहिजे? तर मनुष्याला तादात्म्य मिळालं पाहिजे. जर त्याला तादात्म्य नाही मिळालं तर परमेश्वरावरचा त्याचा सबंध विश्वास ढासळून पडतो आणि परमेश्वर म्हणून कोणी तरी वस्तू आहे, त्याचा विश्वास बसला पाहिजे. म्हणून त्यांची दर्शनं होतात. हे कबूल!

तर एक ते सालोक्य समाधी आणि सामिप्य समाधीमध्ये एक विशेषतऱ्हेची माणसाला जाणीव येते. पण

त्याच्यामध्ये त्याला गती होत नाही. जो जिथे आहे तिथूनच गप्प आहे. पहिल्यांदा दिसत नव्हतं, आता दिसतंय. पहिल्यांदा वाटत नव्हतं, आता वाटतंय. पण त्याची आतमधून गती होत नाही, प्रोग्रेस होत नाही, इवोल्यूशन होत नाही. म्हणजे उत्क्रांती होत नाही त्याची. तेव्हा असा प्रश्न येतो, की उत्क्रांती कशी होणार? ती तादात्म्याने होते. ती तिसरी स्थिती आहे. त्याच्यामध्ये तादात्म्य झालं पाहिजे.

आता तादात्म्य म्हणजे काय? तादात्म्य म्हणजे असं, की ह्या सर्व शक्तींना वाट देणारे हे जे मोठेमोठे अवतार आहेत, ते साक्षात् परमेश्वराचे अंशच म्हटले पाहिजेत किंवा अंशापेक्षा मी त्यांना परमेश्वराचे पैलू म्हणते, ॲस्पेक्ट आहेत. तर हे जे तुम्हाला विष्णू स्वरूप किंवा गणेश स्वरूप किंवा ख्रिस्त स्वरूप, हे जे काही दिसताहेत ते त्या परमेश्वराच्या शक्तीला चालना देणारे, त्या शक्तीला आऊटलेट देणारे आहेत. पण त्या शक्तीतच तुम्हाला सामावून टाकलं, तर तादात्म्य स्वरूपत्व आलं. ती शक्ती जर तुम्ही झालात, तर तुम्हाला तादात्म्य आलं. आता हे जितके काही देव-देवता वगैरे काही आहेत, हे त्या निर्विकार, निराकार शक्तीचे चालन स्वरूप आहेत. त्यांच्यामध्ये ती सर्वव्यापी शक्ती, सामावलेली आहे. ज्याला आपण म्हणू इनफायनाइट इन टू फायनाइट. म्हणजे अमर्यादित जे आहे ते मर्यादित झालेले आहे. अशी ही जी व्यक्ती आहे, तिलाच आपण अवतार म्हणतो. पण त्यांच्यातही जी अमर्याद शक्ती आहे, तेव्हा त्या शक्तीतच तुम्हाला बुडवून टाकायचं. त्या शक्तीतच तुम्हाला तद्रूप करायचं, त्याच्या सागरात तुम्हाला एकाकार करायचं म्हणजेच सहजयोग आहे.

आता त्याला पद्धती अनेक आहेत, लोकांनी काढलेल्या. काळवेळाप्रमाणे त्यांना जमल्या. ज्यांना जमल्या त्यांना जमल्या, नाही तर नाही जमल्या. पैकी सगळ्यात पहिल्यांदा त्यांनी ही पद्धत काढली होती, की हे जे देव-देवता आहेत त्यांचं वर्णन करायचं आणि त्यांना खुश करून द्यायचं. मंत्र जागरण करायचं, मंत्राने त्यांना जागृत करायचं. त्यांना खुश करायचं. त्यांची स्तुती करायची. देवतांना स्तुती प्रिय असते, असं एक लोकांना वाटतं. माणसाच्या जे बुद्धीला आलं त्याने ते केलं. तर स्तुती सुरू केली, त्यावेळेला अज्ञानी असल्यामुळे मनुष्याची बुद्धी एवढी वाढली नव्हती म्हणून म्हणा, किंवा मनुष्याला एवढं समजत नव्हतं म्हणून म्हणा, परमेश्वराने त्याचं एवढं काही वाईट वाटून घेतलं नाही, की तुम्ही अनधिकार चेष्टेमध्ये तुम्ही त्याची आठवण काढता. आणि अनेक अवतार संसारात आल्यावर त्या लोकांनी काही काही लोकांना पार केलं. फार थोडे लोक. आणि हीच मंडळी पुढे जाऊन त्यांनी इतर लोकांना पार करायला सुरुवात केली.

आपण असं म्हणू की परशुरामापासून ही गोष्ट सुरू झाली. परशुरामाचा जेव्हा अवतार झाला, त्यावेळेला व्यक्तिगत अध्यात्माला सुरुवात झाली. लोक एकएकटे जाऊन जंगलात बसून अध्यात्म शिकू लागले. पण परशुराम अवतरण होतं. परशुरामाबरोबर दत्तात्रेयांनीसुद्धा अवतार घेतले होते अनेक. त्यामुळे परशुरामाच्या अवतारामध्ये दत्तात्रेयांचासुद्धा सहयोग झाल्यामुळे कुठेतरी करोडो, लाखोमध्ये, एखाद्याला हे घटत असतं. आणि ते झालं म्हणजे तोही आपला जंगलात बसायचा. त्याच्यापुढचाच तो. फक्त त्याच्याजवळ गेले तर मंडळी ठीक व्हायची, काही झालं तर, 'तो आहे संत मनुष्य! त्याला नमस्कार केला पाहिजे,' वगैरे वगैरे. त्यांनी एक-दोन कार्य अशी मोठी केली, की ज्या ठिकाणी व्हायब्रेशन्स आहेत अशा दगडांना देवत्व आणलं. तिथे देवळं उभी केली. आता आपल्याकडे जसं

आपण म्हणतो, की गणपती आहेत. अष्टविनायक आहेत. ते खरे आहेत. पण त्यांना ओळखून काढायला हीच मंडळी जी थोडीशी, दोन-चार होती जी पार झालेली मंडळी होती, त्यांनी सांगितलं की हे आहेत. त्यांनी पूजनाला सुरुवात केली, तिकडे देऊळ उभारणं झालं. बरं काही काही मोठे मोठे गुरू झाले. त्यांना म्हणता येईल. काही लोक झाले खरे. मग त्यांनी असा विचार केला, की सर्वसाधारण माणसाला काही दिलं पाहिजे. आता ते बोलायचे तिथली गोष्ट. आपण आहोत इकडे. त्यांचे शिष्य झाले, मग त्यांचे शिष्य झाले, तीन-चार. ह्याच्यामध्ये जे खरं होतं ते गेलं चुलीत आणि जे नव्हतं ते सुरू झालं.

जितके काही देव-देवता वगैरे काही आहेत, हे त्या निर्विकार निराकार शक्तीचे चालन स्वरूप आहेत.

खरं हे होतं, की तुम्ही परमेश्वराला अनन्य भक्तीने पूर्णपणे शरणागत होऊन त्याची आठवण केली पाहिजे. त्याला पूर्णपणे हे मागितलं पाहिजे की, 'मला तुझा आशीर्वाद, म्हणजे तुझ्या प्रेमाचा आशीर्वाद म्हणजे तुझ्यामध्ये तद्रूप होऊ दे. तुझ्याशी मला एकरूप होऊ दे.' हेच एक मागणं होतं. हे नाही की माझ्या मुलाला नोकरी लाव. पण मनुष्य हळूहळू अत्यंत जडवादी होऊ लागला. आणि जसाजसा तो जडवादी होऊ लागला तसातसा त्याने परमेश्वराचा दोन वस्तूंशी संबंध लावला. कसा लावला, कुठे लावला? त्यातलं एक तर मला माहिती आहे. पण दुसरा तर मला माहिती नाही. तो कुठे, कधी लावला?

पहिल्यांदा त्याने सेक्सशी संबंध लावला देवाचा. आता देवाचा संबंध सेक्सशी काहीही नाही. अगदी नाहीये. पण ह्याने लावला, ह्याला कारण असं, की काही लोकांनी गणपतीलाच कुंडलिनी म्हणून निर्णय दिला. कारण नुसती सोंड दिसली गणपतीची आणि त्याला म्हटलं की हे कुंडलिनीचं स्वरूप आहे. कारण ते सेक्सवर असतं. म्हणून त्याचा संबंध सेक्सशी लावून ठेवला. पुष्कळ लोक म्हणतात, स्कंदामध्ये कुंडलिनी असते. म्हणजे नाहीच आहे तिथे. तुम्ही डोळ्यांनी बघा नां! मी दाखवते तुम्हाला इथे. स्कंदाशी काहीही संबंध नाहीये. इथे हे श्रीगणेशाला बसवलेले आहे. पण हा जो सुरुवातीला घोटाळा झाला, त्याच्यामुळे सेक्सशी संबंध परमेश्वराचा लावून टाकला. बाप रे बाप! म्हणजे केवढी मोठी घोडचूक. याला घोडचूक म्हणावं की हत्तीचूक म्हणावी हे समजत नाही. परत चूक त्यांनी आपली भोळेपणात केली असेल. पण त्याचा परिणाम बघा काय झाला? आता त्याच्या परिणामाला जोडायला एक आर्टिकल लिहिणार आहे मी एवढं मोठं; पण थोडक्यात सांगायचं म्हणजे सेक्सशी संबंध म्हणजे हे सगळे तांत्रिक आले, मांत्रिक आले. त्याच्यानंतर मग ते काही काही असे लोक की आजच मी एक नवीनच ऐकलं की नवीन सून आली की पहिले महाराजांच्याकडे हवेलीला जायचं तिने. काय म्हणावं या लोकांना. परमेश्वराच्या नावावर हे असले व्यभिचारी धंदे आहेत. व्यभिचाराचा आणि परमेश्वराचा संबंध लावणं म्हणजे हे माणसाच्याच डोक्यात येऊ शकतं. जनावराच्यासुद्धा नाही येणार हं! म्हणजे कसं माणसाचं डोकं हे उलटं बसवलेले आहे की काय आहे! बसवलं देवाने ठीकच होतं. पण तुम्ही कसं उलटं चालवता ते बघा. व्यभिचाराचा आणि परमेश्वराचा

संबंध लावून ठेवलेला आहे. इथपर्यंत त्याची कमाल केली, की अश्वमेध यज्ञासारख्या यज्ञालासुद्धा त्यांनी सांगितलं, तो सुद्धा सेक्सचच एक्स्प्रेशन आहे. शिव-पार्वतीसुद्धा सेक्सचच एक्स्प्रेशन, म्हणजे डोळा, म्हणजे म्हणतात नां की, सावन के अंधे को भी सभी हरा दिखायी देता है। म्हणजे श्रावण महिन्यामध्ये तुम्ही आंधळे झालात तर त्याला सगळच हिरवं दिसतं. तशातलं आहे. म्हणजे सगळं माइंड जे आहे, म्हणजे सगळे डोक्यातले विचार एकाच ह्याच्या भोवती फिरतात. झालं, मग सगळं झालं आता. शिव-पार्वती झाले. म्हणजे सगळ्यांना आणून तुम्ही आता सेक्सच्या ह्याच्यावरती आणून सोडून दिलं आणि अजूनही राजरोसपणे त्याच्याबद्दल लोक बोलताहेत. त्यांना काही लाजा नाही वाटत त्याच्यावरती. अजून पेपरमध्ये छापतात. मूलाधारावरती कुंडलिनी आहे हे त्यांना माहिती आहे. मूलाधार चक्रात ती बसलेली आहे. आता काय सांगायचं तुमच्या आईला तुम्ही सेक्सवर बसवता. काही शहाणपण, तुम्हाला आईपण आहे की नाही. हा एक महामूर्खपणा केला.

आणि दुसरा त्याचा परिणाम म्हणजे, ते मला माहीत नाही कुठून आलं. पण एक पैशाशी देवाचा संबंध लावणं. कमाल आहे बुवा माणसाची! अगदी खरी कमाल आहे. अहो, पैसे काय देवाने बनवले आहे का? तुम्ही बनवले आहेत. पूर्वी पैसे म्हणून काही वस्तू होती का जगामध्ये. त्याचा संबंध परमेश्वराशी कसा लावता तुम्ही? अगदी डोकं आहे माणसाचं, विशेष. म्हणजे बिझनेसच करायचा मुळी. कोणीही आला मनुष्य त्याला हवेल्या पाहिजेत. त्याला मोटारी पाहिजेत. इथपर्यंत असे धर्म जगामध्ये आहेत, की तुमच्या गुरूला तुम्ही जे द्याल तेच तुम्हाला मिळेल. आणि ते कोणते सुख तर त्याला तुम्ही जर बायका दिल्या, त्याने मग इंग्लिश बायकांशी लग्न करायचे, नाहीतर फ्रेंच बायकांशी लग्न करायचं. आणि तुम्हाला पुढच्या जन्मात ते मिळेल. मग त्या गुरूंना तुम्ही हिऱ्यामध्ये तोलायचं. मोत्यांमध्ये तोलायचं. त्यांना मग आता पितळ्यातही तोलायला मिळेल माहिती नाही. पण असले प्रकार. आणि राजरोसपणे सगळीकडे चालू आहे. त्याच्याबद्दल कोणाला ऑब्जेक्शनच नाही. म्हणजे काही तरी त्याला ताळतंत्र पाहिजे. बरं आम्ही काही असं म्हटल्याबरोबर 'तुम्ही आमच्या गुरूला का म्हणता?' कारण हे गुरू आहेत का काय? पायातल्या खेटरांनीसुद्धा मारण्याची मला इच्छा होणार नाही, असे घाणेरडे हे लोक आहेत. त्यांना गुरू म्हणून मिरवता तुम्ही आणि मी जर म्हटलं की या गुरूंना उचलून समुद्रात फेका, तर माझ्यावर बिघडता. सगळ्या तुमच्या कुंडलिन्या मोडून आणि जन्मभरासाठी तुम्हाला यांनी नरकात टाकून ठेवलेले आहे. पण त्यांचाच उदो, उदो चाललेला आहे. आणखीन करा उदो, उदो. हे पैसेखाऊ, आणि हे बायकांच्या ह्याच्यावर येणारे आणि दारू ठोसून प्यायची तिथे.

साक्षात् एक गुरू महाराज आले होते म्हणे. ती बाई त्यांचे पाय चेपत होती आणि तिकडे ते दारू पीत होते. त्या बाईला अक्कल नाही. फार मोठी बाई आहे. सुशिक्षित. तिला एवढी अक्कल नाही, की इकडे हा बसून दारू पितो आहे आणि तिकडे मी त्याचे पाय चेपते आहे. आणि त्याला शरणागती म्हणजे नरकच मिळणार की नाही तुम्हाला. अहो, काही डोकं आहे की काय? माणसाला काही विचार येत नाही म्हणजे काय? इतके मूर्ख कसे? ही, ही एक बाजू झाली. मग दुसरं करा. आता मग हेच देवळात सुरू झालं. देवळात श्रीगणेशाची मूर्ती ठेवायची आणि घाणेरडेपणा करायचा त्याच्यासमोर. तो म्हणजे, चिरकालातला बालक म्हणतात त्याला. त्याच्यासमोर मजल नाही

तुमची की तुम्ही काही घाणेरडे एक अक्षर बोलाल. आणि त्याच्यासमोर घाणेरडेपणा केल्याबरोबर तो जो सडकतो, मग म्हणायचं की नाही, आम्ही आपले हाल करून घेऊ. आम्ही आपलं सॅक्रिफाइस करतोय. कितीही सडकला तरी आम्ही घाणेरडेपणा करू. मग तो तिथून गेला, त्या देवळातून एकदा ते उठले की मग चालले अनाचार. आम्ही तांत्रिक! ह्यांच्यासाठी शब्द नाहीयेत. पण मनुष्य इतका मूर्ख आहे, की त्याला हे सगळं आवडतं. मनोरंजन त्याचं ह्या सगळ्या घाणेरड्या गोष्टींनी होणार.

आणि पैशाच्या बाबतीत तसेच झालेले आहे. देवळात गेले. द्या बुवा सव्वा रुपये. भाडोत्री लोक ठेवलेले आहेत तिथे पूजनाला एवढे मोठे पोट सुटलेले. ही मंडळी आली आणि त्यांनी पैसे घेतले की झालं, त्यांचा सगळा धर्म, 'वा, वा, आम्ही नां इतके लक्ष रुपये चढवले.' बरं, हे ही झालं. मग हवन आदी, पूजन आदि गोष्टीसुद्धा. ह्याला काही अर्थ नाहीये. कारण तुम्हाला अधिकार नाही. हवन, पूजन इतकेच काय, पण त्याचं नावसुद्धा घेण्याचा तुम्हाला अधिकार नाही. मग हवन, पूजन कसलं काढलंय. हवन, पूजन तुम्ही जर सुरू केलं. तर त्याच्यामध्ये हाच गोंधळ! म्हणून आपल्या त्या देशामध्ये पुष्कळ अशा क्रांत्या झाल्या. त्याला ते धार्मिक म्हणतात, मी म्हणेन त्या बौद्धिक क्रांत्या आहेत. त्यांनी सांगितलंय हे सगळं तुम्ही सोडून टाकायचं. आणखीन निराकार परमेश्वरात रहायचं. म्हणून आर्य धर्म, अमका तमका काढला. बरं ते काढून तरी परत तोच मूर्खपणा! नाव नुसतं बदलायचं. कोट बदलला म्हणून आतलं काही बदललं आहे का? नुसतं बाह्यातलं बदलून आतमध्ये तीच स्थिती. निराकाराच्या गोष्टी करून तुम्ही निराकारात उतरू शकत नाही. त्याच्यातही पैसे. पहिलं काम पैसे. ऑर्गनायझेशन. अरे पण तुम्ही करत काय आहात? एखाद्या तरी माणसाचं ट्रान्सफॉर्मेशन झालं का? म्हणजे तुम्ही स्मगलिंग करा. व्यवस्थित. आर्यसमाजी आहात ना! स्मगलिंग करायला काही हरकत नाही. आम्हाला हरकत नाही. फक्त काय? फक्त तुम्ही देवळात नाही जायचं. मग आर्य समाजी तुम्ही पक्के. तुम्ही स्मगलर आहात ना? काही हरकत नाही. तुम्ही गळा कापला भावाचा. काही हरकत नाही. आम्ही सपोर्ट करू. आम्ही तुमच्यासाठी केस लढवायला येतो. काही हरकत नाही. तुम्ही आपल्या सासूला मारता, ठीक आहे. काही हरकत नाही. काहीही केलं तरी चालेल. फक्त तुम्ही एक करायचं, की देवळात जायचं नाही. कबूल, व्वा, उत्तम! सगळ्या तऱ्हेचं लायसन्स मिळाल्यावरती मग आर्यसमाज करायला काय हरकत आहे हो! इकडे तुम्ही धार्मिक होता, तुम्हाला एक सर्टिफिकेट मिळतं. क्लबमध्ये गेले आपले. आर्यसमाज क्लब. झालं. स्मगलिंग केलं तरी काही हरकत नाही. घाणेरडेपणा केला तरी हरकत नाही. बायकांना इज्जत, अब्रू असली तर हरकत नाही. फक्त त्यांना मात्र चंदा द्यायचा, गुरूंना पैसे भरायचे. अशा रीतीने धर्माचं अत्यंत सुंदर रूप संसारात मांडून ठेवलेले आहे. आणि हे बघून परमेश्वराला वाटत असेल, की बाप रे! ही माकडं मी कुठे तयार करून ठेवली? एवढी मेहनत करून ह्या माकडांना मी कुठे आणलेले आहे? ह्यांना डोकं का नाही? धर्माच्या बाबतीत डोकं गहाण का ठेवलं आहे सगळ्यांनी? झालं, हे एक प्रकारचं झालं.

श्रावण महिन्यामध्ये तुम्ही आंधळे झालात तर त्याला सगळंच हिरवं दिसतं.

त्याच्यानंतर एक लाट आली, की सगळे जडवादी लोक सायन्स, सायन्स, सायन्स. देवालासुद्धा सायन्समध्ये आणायला बघतात. अहो, ज्यांनी सबंध सायन्स तयार केला त्याला कुठे तुम्ही ओढता इकडे! सायन्स काय किंवा संसारातला एक एक कण काय, सारा त्याच्याच तर चरणात आहे ना! मग लोकांनी म्हणायचं, की आम्हाला दाखवा परमेश्वर आणून! तुम्हाला परमेश्वर आणून दाखवायला तुमची कमाई काय आहे? तुम्ही कोण? तुम्ही सायन्सवाले नां! मग तुमच्यासाठी तयार आहे नां हे बॉम्ब वगैरे, हायड्रोजन बॉम्ब. उभे रहा त्यांच्यासमोर थरथरत. तुम्हाला देव कशाला पाहिजे दाखवायला आणि देवाला काय पडलं आहे तुमच्यासमोर येऊन उभा राहायला! असे देवाला म्हणणारे असाल तर पहले त्याच्यासमोर आत्मसमर्पण करा. मोठे सायन्सवाले बनता! तर तुमच्यासमोर देव मुळीच येणार नाही. तो काय तुमच्या पूजेला बसलेला आहे? आणि जर तुम्ही त्याला मानलं अथवा नाही मानलं, तरी जे शाश्वत आहे, जे सनातन आहे, ते काही मिटणार आहे का? तुम्हीच मिटणार. परमेश्वर मिटणार नाहीये. तुम्ही काय परमेश्वरावर उपकार करीत नाही, की आम्ही परमेश्वराला फार मानतो. म्हणजे आम्ही महामूर्ख आहोत. तुम्ही मानता म्हणजे, ते साक्षात् आहे. ते जगातले सगळे ग्रह-गोल, तो सूर्य आणि ती पृथ्वी आणि तुम्ही, आम्ही बनवलेत ते कोण? आणि त्याला मानणारे तुम्ही कोण लाटसाहेब? काय मनुष्याचा अहंकार आहे नुसता! हिमालयापेक्षा मोठा अहंकार प्रत्येक माणसाच्या डोक्यात आहे. आता ही सगळी अशी, कलियुगामध्ये उगवलेली अशी उत्तम फळं आहेत. तेव्हा आता बघा तुम्ही. आता सहजयोग! अशा स्थितीमध्ये मी तुम्हाला कुठे अध्यात्मात घातलं असतं, तर एक तरी टिकला असता का? असा विचार करणे. कारण त्याच्यात आधी डोक्यावर चिमटे मारतात म्हणे. आधी चिमटे मारून बघतात. मग लटकवतात उलटे. त्याच्यानंतर खालून धुऱ्या. त्याच्यावर टिकले तर पुढे अशी स्थिती.

तसं नको रे बाबा! मुलं माझीच आहेत नां! कशीही असली, वेडीवाकडी, तरी माझीच. कशीही वागली तरी अज्ञानी. तेव्हा प्रेमाच्या वर्षावाशिवाय काहीही इलाज नाही, असा विचार करूनच आम्ही आलो आहोत या संसारात आणि म्हणूनच असा विचार करून वर्षाव करतो आहोत तुमच्यावरती. आणि तुम्हाला तयार ही केलं आहे, की तुम्ही ते घ्यावं. त्या प्रेमाला आपल्यामध्ये स्थान देऊन स्वत:लाही सुंदर करून घ्यावं आणि दुसऱ्यांनाही ते प्रेम वाटावं. आणि हे प्रेमाचे मोती सगळीकडे उधळत फिरावे. आणि सगळ्यांना ह्याचा लाभ व्हावा. तुम्हाला जे अलभ्य मिळेल, त्याची किंमत तुम्हाला येणार नाही. त्या धडपडणाऱ्यांना जाऊन विचारा म्हणजे ते सांगतील तुम्हाला. अजून धडपडत आहेत, तंगड्या तोडत आहेत. त्यांना माहिती आहे ते किनाऱ्यावर बसले आहेत. पण तुम्ही फक्त तिकडेच जाता. परत चालले खाली. तेव्हा जरा नेटाने बसा. नुसतं तुम्हाला आम्ही कळसावर बसवलेले आहे. तिथेच सगळं एका बंडलात तुम्हाला दिले आहे. नुसतं बसून रहा तुम्ही. बसल्याबरोबर तुमच्या आतमध्ये जे चाललं आहे, ते देत रहा लोकांना. किंवा असं समजलं पाहिजे की पाजळलेला दिवा तुम्ही असा खाली ठेवत नाही. तो मंदिराच्या वर ठेवता. कारण तिथून लोकांना तो मार्गदर्शन करतो. जर आम्ही तुमचे दिवे पेटवले आहेत, तर ते मार्गदर्शनासाठी आहे. अंधाऱ्या रात्रीवर मात करण्यासाठी. रस्त्याने ही मंडळी धडपडत आहेत, त्यांचे मार्ग उजळण्यासाठी. ते असे वाया घालवण्यासाठी नाही. दुसऱ्यांची घरं जाळण्यासाठी नाहीत. पण सहजयोगाबद्दल फार मोठी सर्कस करायला नको. सगळ्यांचं म्हणणं आहे, की माताजी, तुमची पब्लिसिटी फार कमी आहे, वगैरे वगैरे. असू देत. हळूहळू ह्यांच्या

पब्लिसिट्या कमी होतील. कारण समोर येतंय सगळं साक्षात्. लोकांना दिसतंय सगळं काही आणि पटतंय. हळूहळू येतील, पण नंतर हे मार खाऊन आलेले लोक आहेत त्यांना तुम्ही ठीक करत बसा. आम्ही तर कंटाळलो आहोत, पहिल्यांदा सांगायचं म्हणजे. कारण इतका मूर्खपणा जगामध्ये आहे की कोणाला सांगितलं रे सांगितलं, की त्या माणसाकडे तुम्ही जाऊ नका, की तो मला मारायला धावतो. फार मोठी जबाबदारी तुमच्यावर आहे.

मुख्य म्हणजे प्रत्येकाने खुले आम लोकांना सांगायला पाहिजे, बेधडक! त्याच्याबद्दल काहीही भीती ठेवायला नको. माझं नाव वापरा. देवळात जाऊन, तिथे भेटतील, हे सगळं ढोंग आहे. कुठेही असा गुरू दिसला, की त्याला दोन जोडे मारून यायचे. त्याला सांगायचं तिथेच, की हे ढोंगीबाबा, तुम्ही निघा म्हणून. आता भारतीय विद्या भवनमध्ये आज पण एक प्रोग्रॅम होतो आहे. जायला पाहिजे १५-२० मंडळींनी. विचारा, 'काय चालवलं आहे तुम्ही? याने काय मिळणार आहे? ह्याने काही लाभ होतो का? तुमची एवढी चक्रं धरली आहेत, तुम्ही काय सांगता? सगळ्यांना पागलखान्यात पाठवाल.' सगळ्यांनी असं बोलणं सुरू केल्याशिवाय ही चळवळ होणार नाही. घरी, आपल्या शेजारी, जे असतील त्यांना स्पष्ट सांगायचं की, आम्ही तुमचे नातलग आहोत. आम्ही तुम्हाला शेणात जाऊ देणार नाही. तुमचा सत्यनाश होऊ देणार नाही. प्रत्येक माणसाने असा निश्चय करायचा. सगळ्यांना सांगायचं. कारण तुम्हाला ह्याचा अनुभव आलेला आहे. तुम्ही जाणकार आहात. अशाच रीतीने ......(अस्पष्ट) पेटतात आणि उजेड पडतो. अशाच रीतीने कार्यसिद्धी होते. पण सगळे आपले, आम्हाला मिळालंय माताजी, कसं बोलायचं. ही सहजयोगाची पद्धत नाही. मीच एकटी बसून चालणार नाही. तुम्ही सगळ्यांनी बोलायला पाहिजे. कुठेही दिसलं की सांगायचं की, 'तू भामटा आहेस. तू पैसे खातो सगळ्यांचे.' ही तुमच्यावर जबाबदारी आहे. ही सर्व सहजयोग्यांवर जबाबदारी आहे. कोणताही नातलग अशा घाणेरड्या, भोंदू माणसाकडे जात असेल, तर त्याच्याकडे जेवायला जायचं नाही. वाळीत टाकायचं त्याला. जेवायला गेल्यावर तुमची नाभी धरणार. मी काही करणार नाहीये, पण तुमची नाभी धरणार. जा जेवायला त्याच्याकडे. 'आम्ही कसं म्हणायचं माताजी? ते आमचे नातलग सख्खे चुलत सासूचे, सख्खे अमके.' ते सख्यातले तीन आले की गेलात तुम्ही तिथे. तुमचे सख्खे हे आहेत, इथे बसलेले. हे तुमचे भाऊ आणि ह्या तुमच्या बहिणी. ह्यांच्या पलीकडचे लोक जर ह्याच्यात नाही आले, तर तुमचं कोणी नाही. हे लक्षात ठेवा तुम्ही! हे परमेश्वराच्या साम्राज्यात बसलेल्या लोकांनी अशा हलक्या लोकांच्याकडे जेवायला जायचं नाही. आपलीसुद्धा एक असते. आपल्या अब्रूने रहायला पाहिजे. आणि परत हे डोकं कोणाच्याही पायावर ठेवायचं नाही. आणि जाऊन सांगायचं सहजयोगाबद्दल बेधडक. हे सगळे सांगत बसतात, खोटारडे कुठले. तुम्ही सांगू नाही शकत! इतकी तोंडं असून बोलता येत नाही का तुम्हा लोकांना! सहजयोगामध्ये मनुष्य जरा नरम फार होऊन जातो. तसं नसलं पाहिजे. वाटलं तर तलवार ही घेता आली पाहिजे आणि वाटलं तर

तुम्हाला जे अलभ्य मिळेल, त्याची किंमत तुम्हाला येणार नाही.

हातात कमळाची फुलंसुद्धा घेता आली पाहिजेत. सहजयोगाचं वैशिष्ट्य हेच आहे. जिथे पाहिजे तिथे तलवार ही घेता आली पाहिजे. आणि तुम्ही माणसं तेजस्वी पण आहात. कधी काळी लढलेले पण आहात आणि कमळं घेऊन पूजासुद्धा केलेली आहे. तेव्हा सहजयोगामध्ये आलेल्या लोकांनी आपली वीरश्री सोडायची नाही. जे चूक आहे ते चूक आहे. शंभरदा चूक आहे. ते करायचं नाही. स्वत:ही नाही आणि दुसऱ्यालाही ते करू द्यायचं नाही. असं झाल्याशिवाय सहजयोग आपल्या फळाला उतरणार नाही. इतकं सत्य सहजयोगामध्ये आहे. ज्याला क्विक रिझल्ट म्हणतात, सगळं काही असूनसुद्धा आपला सहजयोग फार हळूहळू फोफावतोय. त्याला कारण तुम्ही जोराने पसरवत नाही त्या गोष्टी. प्रत्येकाने विचार केला पाहिजे की मी सहजयोगासाठी काय काय करू शकतो? कसा पसरवू शकतो? माझ्या शेजारी दहा माणसं आहेत. चला बोलवा त्यांना जेवायला, चहाला. सहजयोगावरती भाषण सुरू. काय हरकत आहे? लोकांना कळलं पाहिजे, सहजयोग म्हणजे काय आहे?

साधीसुधी गोष्ट नाहीये. आणि सहजयोगी म्हणजे एक विशेष तऱ्हेचा नागरिक आहे. एक विशेष तऱ्हेचा जीव आहे. आणि तो म्हणजे गणपतीसारखा सर्वशक्तिमान आहे. गणपतीला सांगावं लागत नाही काही. धुमधडाका ....(अस्पष्ट) त्याचं नावच ठेवलेले आहे आम्ही. त्यांना म्हणावं लागतं, थांबा, थांबा, कुठे निघालात तुम्ही? तुम्हाला त्याच्याच सारखे बनवलेले आहे. अर्थात् ते साधू लोक मोठे मोठे त्यांना समजत नाही, की माताजी करतात तरी काय हे? सुरू काय केलं आहे? गणपतीसारखं व्हायला पाहिजे. त्यांना कोणाची भीती नाही जगात. जे खरं आहे, त्या सत्यावर तो उभा आहे. जे खरं आहे त्याच्यासाठी कोणाला घाबरत नाही. सगळीकडे जे जे तुमच्या ओळखीचे आहेत, जे जे तुमच्या माहितीतील आहे त्यांची लिस्ट काढायची. पुढच्या वेळेस मी आले की दिसल पाहिजे. जास्तीची मंडळी ह्याच्यात यायला पाहिजे.

आता पुढच्या वेळी शनिवारी प्रोग्रॅम ठेवला आहे, भारतीय विद्या भवनला. लोकांना घेऊन या. प्रयत्न करा. दोन-चार दिवस इकडे तिकडे प्रयत्न करून, शनिवारी संध्याकाळी भारतीय विद्या भवनला प्रोग्रॅमला घेऊन या. त्याच्यानंतर कदाचित कोणताच प्रोग्रॅम होणार नाही. शेवटचाच प्रोग्रॅम आहे. माटुंग्याला सोमवारी आहे. तिथे आलात तर बरच आहे. सगळ्यांनी यायचं. पण भारतीय विद्या भवनला सहजयोग्यांसाठी आहे. तिथे मी दुसरंच बोलीन. कारण अजून तिथे कोणी पार झालेली मंडळी नाहीत. आता सहजयोगासाठी काय काय करायचं? नुसतं तुम्ही परमेश्वराला विचारल्याबरोबर मला अनेक अनेक विचार तो देणार. काय करायचं? पुढे जायचं तर काय करायचं? आणि काय मजा येते तिथे बघा. नाहीतरी संसारात काय मिळवायचं आहे? तीच भाजी-पोळी रोज खायची. दोन पैसे शिल्लक मुलांसाठी सोडून जायचं. ह्याच्यापलीकडे ह्या जीवनाच्या चाकोरीत तुम्हाला काही मिळालं आहे का? पण सहजयोगाने मातीलासुद्धा सुगंध सुटेल अशी व्यक्ती तुम्ही झालेले आहात. जिथे तुमचे पाय पडतील तिथून सुगंध वाहणार आहे. तेवढी शक्तिशाली किमया तुमच्यामध्ये आहे. तिचा उपयोग करून घ्या. एक क्षणसुद्धा त्यामध्ये वाया दवडायचा नाही. कमाई, पैसे हे चालूच आहे. त्याबद्दल कितीही केलं तरी काय करणार? कमवून तरी काय मोठे दिवे लावलेत? साधारणपणे संतोषाने संसारात राहिलं पाहिजे. जे मिळालं प्रभू, पुष्कळ आहे. संतोषी मनाने राहून, संतोषात राहून, संतोष खरोखरच सहजयोगाचा मुकुट आहे. संतोषामध्ये राहून आणि अत्यंत

पवित्र जीवन आपलं करण्याकडे लक्ष दिलं पाहिजे. प्रथम म्हणजे खोटं बोलणं, इकडून तिकडे लबाडी करणं, चोऱ्यामाऱ्या, त्याशिवाय दुसऱ्यांना दुखवणं, वाईटपणे बोलणं हे सगळं सोडलं पाहिजे. स्वत:कडे लक्ष असायला पाहिजे. स्वत:चं काही चुकलं असेल तर त्याच्यासाठी परमेश्वराकडे क्षमा मागितली पाहिजे. स्वत:मध्ये सौंदर्य असलं पाहिजे. म्हणजे काहीतरी भुतासारखे वेष घेऊन फिरायला नको. मनुष्याला स्वच्छ रहायला पाहिजे. आपल्या घरामध्ये सगळीकडे सौंदर्यशाली असलं पाहिजे. दुसऱ्याशी बोलतांना सुद्धा एकतऱ्हेचं सौंदर्य असलं पाहिजे. वागतांना किंवा काहीही कार्य करतांना मनुष्यामध्ये एकतऱ्हेचं सौंदर्य असायला पाहिजे. प्रामाणिकपणा असला पाहिजे आणि काहीही द्राविडी प्राणायाम करण्याची गरज नाही. आरडाओरडा करण्याची गरज नाही. मध्यम मार्गावरती राहून साक्षीस्वरूपाने सगळं नाटक बघायचं. इतकं जर साधलं तर सहजयोग तुम्ही साधला. तुमचं जीवन एकदम बदलून जाईल. जी तुमची मूल्यं आहेत, तुमच्या ज्या प्रायॉरिटी आहेत, त्या एकदम बदलून तुमचा आराखडाच वेगळा होऊन जाईल. सगळं टेबलच बदलून जातं. असं झाल्याबरोबर ज्या गोष्टींचं मूल्य नाही त्या गोष्टी जरूर पडून जातात.

आता एक लहानशी गोष्ट म्हणजे आमची तुमच्याकडे बरणी राहिली. तर ती बरणी तुम्ही आम्हाला पाठविली नाही. आता लहानशी गोष्ट बघा. आपलं महाराष्ट्रातलं कॉमन आहे बायकांचं. म्हणून सांगते. आता हे बघा, त्यांचं कसं हो? मग चालले देवळात की 'तुमची ती बरणी राहिली होती ना त्यांनी पाठवली नाही.' 'अहो, तुमची आम्ही पाठविली.' मग त्यांनी तिसरीला सांगायचं. म्हणजे असल्या मूर्खपणाच्या गोष्टीमध्ये, सबंध आयुष्य घालवण्यापेक्षा, माझ्या मते अशा आयुष्याला इस्त्री केलेली बरी. थोडासा दिलदारपणा, थोडासा मोठेपणा येऊ देत! तो नसला तर सहजयोगाचा गौरव नाही. त्याची ग्लोरी दिसली पाहिजे तुमच्या चेहऱ्यावर. व्हायब्रेशन्सनेसुद्धा तुम्ही पाहिलं तर फळांनासुद्धा ग्लोरी येते. मग माणसाला केवढी ग्लोरी यायला पाहिजे. असा एक मनुष्य जर चमचमीत जेवायला मिळालं किंवा नाही मिळालं, तुम्हाला चांगले कपडे मिळाले अथवा नाही मिळाले, संतोषात बसलेला असला तर त्याचा परिणाम इतरांवर होणारच. आणि दुसरे लोक म्हणतील, हा एक मनुष्य आम्ही बघतो, किती संत आहे हो! पण जेव्हा अन्यायाची गोष्ट येईल तेव्हा परमेश्वराच्या विरुद्ध एखादी खोटी गोष्ट घेऊन कोणी उभा राहिला तर त्या वेळेला तलवारी घेऊन निघायलाच पाहिजे. तेव्हा घाबरण्याची काही गोष्ट नाही. पण नसत्या, फालतू गोष्टींसाठी आपले चित्त घालवायचे नाही. कारण हे चित्त परमेश्वराच्या चरणावर आम्ही वाहिलेले आहे. आणि त्याच्या चरणाच्या अमृताने आमच्यावर वर्षाव केलेला आहे. आम्ही प्लावित आहोत. तेव्हा अशा फालतू गोष्टींसाठी आम्ही आमचे चित्त दवडणार नाही. तेव्हा स्वत:च्या आत्मसन्मानात, गौरवात उभे रहा.

परत आपली भेट होईल शनिवारी आणि त्या पूजनाची व्यवस्था ही मंडळी करण्याच्या विचारात आहेत. आणखीन काही प्रश्न असतील तर विचारा. आणि मग थोडावेळ ध्यानात जाऊयात.

# आत्मानुभव

औरंगाबाद, ९ डिसेंबर १९८७



आता आपल्याला सांगायचं काय, की पुण्यभूमीत जन्माला आले. ही पुण्यभूमी. औरंगाबाद ही फार मोठी पुण्यभूमी आहे असं मला वाटतं. मोठमोठाले संत लोक इथे झाले. केव्हापासून, हजारो वर्षापासून इथे लोकांनी मेहनत केली आणि तुम्हाला एवढं पुण्यदान दिलेले आहे. त्या पुण्याच्या दमावर आज आपण इथे बसलात. सदाचरण केलं. धर्माने वागलात पण अजून पूर्णत्वाला आला नाहीत. म्हणून आत्मानुभव घेतला. आत्मानुभव मिळाल्यानंतर जे आपल्यातले दोष आहेत ते बघता आले पाहिजेत. नाहीतर तुम्हाला प्रकाश मिळालेला नाही.

आता परदेशी लोकांचे जे आहे, त्यांचे दोष वेगळे आहेत आणि हिंदुस्थानी लोकांचे दोष वेगळे आहेत आणि ते इतके ठळकपणे आपल्याला दिसतात, की कधी कधी असं वाटतं की स्पष्टपणे सांगितलेले बरे. खरं म्हणजे हिंदुस्थानी लोकांना, भारतीय लोकांना माझं घर, माझी मुलगी, माझा नातू, हे फार आहे आणि त्या घरात इतके गुरफटलेले आहेत, की त्याच्या बाहेर त्यांना निघता येत नाही. आम्ही इथून चार-पाच मुलांना लग्न करून ऑस्ट्रेलियाला पाठवलं. त्यांना नोकऱ्या नव्हत्या. तिथे जाऊन त्यांना मोठाल्या नोकऱ्या मिळाल्या. लगेच त्यांनी आपलं घर स्थापन केलं. घराशिवाय हिंदुस्थान मनुष्य राहुच शकत नाही. आश्रमातसुद्धा सगळी व्यवस्था असतांना आपलं वेगळं घर करतात. त्यांच्या बायका कंटाळल्या. कारण वेगळं घर करायचं तर सगळं काम स्वत: करावं लागतं. तिथे मोलकरणी नसतात, काही नसतात. त्यांना बाळंत व्हायचं तरी स्वत: काम करायची. गर्भारशी असल्या तरी स्वत: कामं करायची. नवऱ्याने बाहेर गमजा मारायच्या. मोटारी फिरवायच्या. टेलिव्हिजन घ्यायचा. मग सगळीकडे फिरायचं आणि फिरून घरी आल्यावर बायकोवर गमजा मारायच्या. 'स्वयंपाक ठीक केला नाही, तू असं ठीक केलं नाही.' त्या बायका कंटाळल्या. हे काय? कसले म्हणे नवरे! सगळं काम करता येत नाही. बाहेरची स्वच्छता करता येत नाही. फक्त माझं घर असलं पाहिजे व्यवस्थित आणि आपलं बाहेर फिरायचं आणि ते सगळ्यांचच आहे आपल्या इथे.

आपल्या इथल्या पुरुषांना कशाला हात लावता येत नाही. हाताने काम करता येत नाही. सगळे पांढरपेशे इथून तिथून.

आमच्याकडे आम्ही एक माळी ठेवले. माळी आहेत बरं का ते! .......(अस्पष्ट) तिथल्या .......(अस्पष्ट)चे ते ॲग्रीकल्चरचे ॲडव्हायझर आहेत. ते इथे आले. ते आपले हातात फावडं घेऊन, कुदळ घेऊन मेहनत करताहेत. आणि हे कमरेवर हात ठेऊन बसलेत. पायात रबराचे बूट घालून. म्हटलं पायात रबराचे बूट कशाला घातले? म्हणे, 'मला चिखलाने त्रास होतो.' 'असं का? मग आता तुम्ही कुठेतरी जाऊन राजेसाहेब व्हा.' हे आपल्यामध्ये फार जास्त आहे. आणि बायकांचं विशेष झालंय. कारण त्यांना हे कळतं, की पुरुषांना जर घर व्यवस्थित करून दिलं, चमचमीत जेवायला दिलं तर आपल्या हातात असतात. मग त्या घरामध्ये खूप चमचमीत, आज हे करायचं, उद्या ते करायचं. मग जेवणात हे द्यायचं. म्हणजे तुम्हाला हे आवडतं. मग त्यांना जर कारली आवडतात तर कारली आणायची बाजारातून. शिजवून द्यायचं, नवऱ्याची सगळी सेवा करायची. नवऱ्याच्या मागे मागे लागायचं. त्याने नवरे खराब होतात पहिली गोष्ट. आणि घर म्हणजे काहीतरी विशेष असं जे आपण केलेले आहे, त्याच्या पलीकडे काही आहे तिकडे लक्ष जात नाही. ते माझं माझं आहे, ते इतकं संकुचित, संकुचित, होता होता आपण त्या पलीकडे जात नाही. तर हे आपल्यातलं एक जायला पाहिजे. तुम्ही सहजयोगी, तुम्ही योगीजन झालेत. जिथे बसाल तिथे तुमचं घर. जिथे जाल तिथे तुमचं घर. कुटुंब एवढं लहानसं, की काही विचारायला नको. ते लहानपण मोठं कसं होणार? आणि त्यामुळे जेवढे काही कमवलेले पूर्वजन्मातले पुण्य आहे, ज्याच्यामुळे तुम्ही ह्या भारतभूमीत, ह्या योगभूमीत जन्माला आलात, त्याचा सर्वनाश होतो. ते मोठेपण यायला पाहिजे. ते मोठंपण येत नाही आणि पुरुषांच्यामध्ये तर फार कमी असतं असं ह्या लोकांचं म्हणणं आहे. आता सगळ्यांनी लिहून पाठवले आहे, की आम्हाला हिन्दुस्थानातल्या बायका फार आवडतात, पण पुरुष नको. कारण सगळे आळशेश्वर आहेत. ते दिसतं आपल्याला! घराच्या बाहेर जर घाण पडलेली असली, तर आपण ती तुडवून सरळ वर जाऊ, पण घर मात्र बायका स्वच्छ ठेवतात. बरं बायका हुशार आहेत. घर ठीक ठेवलं पाहिजे, म्हणजे नवरा घरात राहतो. त्याला घरात ठेवणंच कठीण. कारण तो सारखा घरातून पळतच असतो. तेव्हा आपल्यातली जी चूक आहे, ती ही आहे, की आपल्यामध्ये सामूहिकतेचा मुळीच अंश नाही. सामूहिकतेत कसं रहायचं, सगळ्यांनी मिळून मिसळून कसं रहायचं. सगळ्यांनी आपुलकीने कसं रहायचं. हा विचार नाही.

आता आम्ही दिल्लीला मोठ्या मुश्किलीने आश्रम काढला. तिथे एक मनुष्य रहायला तयार नाही. नवरा-बायकोला दादा-पुता करून मुंबईहून पाठवलं. दोन दिवसात परत. 'माझं घर,' ही जी भावना, ती आधी तोडायला पाहिजे. 'सगळं जग माझं घर आहे,' असं ज्या दिवशी तुम्ही म्हणाल, तेव्हाच म्हटलं पाहिजे तुमचं थोर मन झालेलं आहे. मन इतकं संकुचित आहे. त्याच्यामुळे वाढ कशी होणार सहजयोग्यांची? जरी सहजयोगी झाले, जरी ध्यान करतात, पूजन करतात, सगळं काही चांगलं आहे, पूर्वपुण्याई आहे. पण जैसे थे. त्याच्या पुढे काही होत नाही वाटचाल. त्याला कारण मी शोधून काढलं, की अत्यंत घुटमळणं आहे घरातल्या घरात. जर तिथेच तिथे गोल गोल फिरायला लागले, तर पुढे कसे जाणार? सामूहिकतेत उतरता येत नाही. सगळं स्वत:ला धरून निर्माण करायचं. स्वत:ची प्रतिष्ठा वाढवायची. स्वत:चं घर, स्वत:ची बायको, स्वत:ची मुलं, अमकं, तमकं, हे. जोपर्यंत तुम्ही

ह्याच्यातून बाहेर निघत नाही, आणि नुसती गाढव मेहनत! ती गाढव मेहनत आहे. सगळं जर परमेश्वर करतो, तर तुम्ही कशाला गाढव होता? जेव्हा तुम्ही म्हणाल की, 'मी सर्व काही करतो.' तर तुम्ही गाढव झाले. जसे ख्रिस्त गाढवावर बसले होते आणि ते गाढव त्यांना घेऊन चालले होते. त्या गाढवाला असं वाटलं की, 'सगळेजण माझ्या गळ्यात हार घालतात म्हणजे मीच ख्रिस्त झालो.' ते ख्रिस्ताला जरा त्रास देऊ लागले तर त्यांनी गाढव सोडलं आणि दुसरीकडे निघून गेले. तर तिकडून ज्याचं ते गाढव होतं तो परीट आला आणि त्याने दोन-चार हाणले त्या गाढवाला. मग त्याच्या लक्षात आलं की, 'मी गाढवच आहे.' तर जो ख्रिस्त होता तो ख्रिस्त आहे. तसेच जो योगीजन आहे, तो योगीजन आहे. तो काही गाढव नाहीये. नसती गाढव मेहनत! आपल्या बायकोला खुश करायचं! ह्याला खुश करायचं, त्याला खुश करायचं. ह्याची काहीही गरज नाही. सामूहिकतेत उतरलं पाहिजे आणि सामूहिकतेत उतरण्यासाठी ह्या सगळ्या लहान लहान क्षुद्र गोष्टी सोडल्या पाहिजेत आणि क्षुद्र माणसाला सगळं क्षुद्र दिसतं. मोठं काही दिसत नाही. सगळं काही जे क्षुद्र आहे, जे चुकीचं आहे, ते पहिल्यांदा धरतं. म्हणून आपल मन आधी थोर केलं पाहिजे. पहिल म्हणजे, माझं घर हा शब्द गेला पाहिजे. 'माझा' शब्द हा खोटा आहे. माझ्या ह्याला काही अर्थ आहे? मी जसं काल म्हटलं कबीराचं, की एक ठगवा आला आणि मला लुटून घेऊन गेला. म्हणजे कोण? मृत्यू. ज्यावेळेला मृत्यू होतो, तेव्हा सुटतं. माझे वगैरे सगळे सुटून जातात. पण हा मृत्यू आपला झालेला आहे. कारण आता आपण सहजयोगी झालोत. जे आपण अंडरूपाने होतो, ते आपण पक्षीरूपाने झालो. तेव्हा ते मागचे सगळे काही सुटलेले आहे. आता आपण पंख पसरून भराऱ्या मारायच्या आहेत. ते सोडून अजूनही आपण त्या पंखात घुसलेलो आहोत. त्याला काय म्हणावं! त्या चिखलात आपण रूतून बसलेलो आहोत. तेव्हा ते बरोबर नाही. ह्यापुढे प्रत्येकाने आपलं मन थोर केलं पाहिजे. मोठंपण आणलं पाहिजे आणि ते मोठंपण आणण्याचं कारण हे, की सगळ्यामध्ये रममाण झालं पाहिजे.

इतकी मंडळी इथे येतात. तुम्ही त्यांना भेटत नाही, त्यांच्याशी बोलत नाही. कोणाची ओळखपाळख करत नाही. हे बरोबर नाही. ही मंडळी आली, कोण? काय? त्यांच्या सेवेला असतात हे कबूल. पण त्यांच्याशी ओळख झाली पाहिजे. मैत्री झाली पाहिजे. कारण हे तुमचे भाऊ आहेत आणि तुम्हाला कोणी भाऊ नाही. कोणी बहिणी नाहीत. हे तुमचे नातलग. हे तुमचे सगेसोयरे होती, असं म्हटलेले आहे. ज्ञानेश्वरांनी स्पष्ट म्हटलेले आहे, हे तुमचे सगेसोयरे. हे तुमचे सगेसोयरे आहेत. बाकी जे काही आहेत ते तुमचे सगेसोयरे नाहीत. कारण त्यांची आणि तुमची बरोबरीच नाही. ते बोलतात एक, करतात एक. आम्ही आमच्या घराण्याचंच सांगू शकतो की असं आहे. काही लोक आहेत ते आहेत, नाहीत ते मला नाही. ते परके आहेत. तेव्हा जे लोक सहजयोगात नाहीत ते आपले नातलग नाहीत. त्यात तुम्हाला आश्चर्य वाटेल, पुष्कळशा गोष्टी सुटून जातील. म्हणजे आता मराठा आहे, तर मराठ्याने मराठ्याशीच लग्न करायचं. त्याने बायकोला झोडपलं तरी चालेल. तो सहजयोगी नसला तरी चालेल. त्याने कसंही वागवलं तरी चालेल. पण मराठ्याने मराठ्याशी केलं पाहिजे. कशाला? मग जर त्या मुलीला उद्या त्रास झाला, तुमचे मराठे उभे राहणार आहेत का? पण सहजयोगी मात्र उभे राहतील. सहजयोग्याने सहजयोग्याशीच लग्न केलं पाहिजे. मग त्याचे त्रास सुरू झाले की, 'माताजी, आम्ही असं केलं त्यामुळे असे त्रास झाले.' हा जो जाती द्वेष आहे, आणि हा जो धर्माबद्दल द्वेष आहे किंवा परजातीबद्दल किंवा परदेशांबद्दल जो द्वेष आहे, तो लग्न करूनच जाईल. दुसरा मला काही

इलाज दिसत नाही. म्हणजे डोळ्याने बघून कळतं.

आता परवाच एक मराठ्याच्या मुलीचं लग्न आम्ही ऑस्ट्रेलियाला केलं. त्यांच्या घरातल्या लोकांनी नुसता आकांडतांडव मांडला होता. म्हणे की, 'आम्ही जाऊन पोलिसात देऊ.' म्हटलं, 'जा. काय करायचं ते करा. ती आता तरुण झालेली आहे. तिला सर्व अधिकार आहेत.' एवढं त्यांनी केलं, पण त्यांचं काही चाललं नाही. आता ती मुलगी इतकी शहाणी आहे. तिचं इतकं सुंदर लग्न झालं. नवऱ्याला फार मोठा पगार वगैरे. ते दिसतं त्यांना. आता सगळे निघाले ऑस्ट्रेलियाला जायला. गाठोडी बांधून. लग्नाच्या वेळेला मूर्खपणा केला. तसेच, आम्ही ब्राह्मण आहोत, ब्राह्मणालाच देऊ. ब्राह्मणाने जर उद्या काढली घरातून तर काय करणार तुम्ही? मग माझ्याकडे यायचं. 'माताजी, काहीतरी आता करा तुम्ही आमच्या जावयावर.' काय करणार? तुम्ही असा शोधून जावई ब्राह्मण शोधला. मग आता त्याच्या गळ्यातच बसा. मी त्याला काय करणार? याप्रमाणे अनेक मोठमोठाल्या गोष्टी आपण आंधळेपणाने घालवत आहोत. आणि हे अनेक प्रश्न आपल्यासमोर एवढ्यासाठीच उभे राहिलेत. कारण आपण आपलं हृदय मोठं केलं नाही. आपण योगीजन नाही. आतून आपण संन्यस्त झालोत. बाहेरून जरी नाही संन्यास घेतला. आपण संन्यस्त झालो आहोत. आणि आपण संन्यस्त झालोत ह्या गर्वामध्ये तुम्ही राहिलं पाहिजे. आणि त्याचाच आनंद मानून घेतला पाहिजे. नाहीतर तुमची प्रगती होणारच नाही. कधीच प्रगती होणार नाही. काही जरी केलं तरी तुमची प्रगती होणार नाही, जोपर्यंत तुम्ही आपलं मन थोर करणार नाही. आणि ह्या अशा चुकीच्या समजूती आपल्यामध्ये पुष्कळ आहेत. त्या गेल्या पाहिजेत. त्या गेल्याशिवाय आपण खरोखर योगीजन आहात असं कोणी म्हणू नये. तेव्हा कोणीही अशा भलत्यासलत्या ज्या गोष्टी आहेत, त्या ठेवल्या नाही पाहिजे. तुम्हाला आश्चर्य वाटेल, मी जे सांगते आहे, त्याच्या आधी इथे, ह्या महाराष्ट्रात जेवढे मोठमोठाले संत-साधू झाले, फार मोठमोठाले संत-साधू झाले, त्या संत-साधूंनी हेच सांगितलं, की जात-पात, ही धर्मांधता, किती वाईट आहे! वाट्टेल तो दगड घ्यायचा. त्याला शेंदूर फासायचा. त्याच्यावर, दुसरे सरस्वती असं म्हणतात, की ते थुंकत असत. असा एखादा दिसला, की जाऊन थुंकायचं. ह्याच्यावरती त्यांनी इतक्यांदा शस्त्र उगारलं. पण एकटेच होते बिचारे. ज्ञानेश्वरांनीसुद्धा किती छळ सहन केला. कारण ते 'संन्याशाचे पुत्र', असे म्हणून त्यांना त्रास दिला. अहो, तसे कोणाचेही पुत्र असले, तरी ह्या सर्व ब्राह्मणांपेक्षा उच्च होते ते!

अशाप्रकारे आपल्या देशामध्ये अनेक गोष्टी झाल्या आहेत. तेव्हा त्या इतिहासापासून आपण काही शिकलं पाहिजे. आणि आता आपण योगीजन झालो आहोत. तेव्हा आपणच अशा स्थितीत वागलं पाहिजे की आपल्या मुलभूत तत्त्वावर आपण उभे आहोत. आपण आपले मिळवलेले आहे. तेव्हा आता आम्ही हे काहीही नाही. आम्ही फक्त योगीजन आहोत आणि योग्याला हे सगळं काही शोभत नाही. अशा रीतीने ह्या सर्व काही आजपर्यंतच्या तुमच्या ज्या समजुती आहेत किंवा आजपर्यंतची जी धारणा आहे, ती सोडून तुम्ही परमेश्वराला आपल्या हृदयात स्थान दिलं पाहिजे. ह्या सर्व गोष्टी सोडून, त्याचा हट्ट नाही धरला पाहिजे. चोखामेळासुद्धा संत होते. तसेच आपले रामदासस्वामीसुद्धा संत होते. पण रामदास स्वामींचे शिष्य आणि चोखामेळ्यांचे शिष्य, ह्यांच्यात अत्यंत भांडणं झाली. ही आश्चर्याची गोष्ट आहे. दोन्ही संत असतांना त्यांच्यात भांडणं कशाला असायला पाहिजे! पण असणारच.

कारण दृष्टी नाही ना! तेव्हा तेवढ्यापुरतं दिसतं. आणि म्हणून सगळ्यांना माझं असं सांगणं आहे, की आता ह्या जाती-पाती आणि मूर्खपणातून आता निघालंच पाहिजे. ते मुसलमानांमध्ये आहे, ख्रिश्चनांमध्ये आहे, सगळ्यांमध्ये एकसारखं आहे. पण एवढे धर्म करूनसुद्धा मला तुम्ही फक्त एवढं सांगा, की कोणत्याही धर्मामुळे मनुष्य हे पाप करू शकत नाही असं दिसलंय का कुठे? सगळ्या पापाला तयार. कोणी म्हटलंय? तो मुसलमान असेना का, हिंदु असेना का, ख्रिश्चन असेना का की 'कोणतेही पाप मी करणार नाही.' असा मी पाहिला नाही. पण योगीजन ते करू शकत नाही. जर केलं तर हातातून व्हायब्रेशन्स जाणार. संत लोकांनी कधी पापं केली नाहीत. त्यांना सांगावं लागलं नाही. आपोआपच ते असे झाले. तसच आपण सर्वांनी व्हावं. आणि नेहमीचं हे अढळ पद आहे ते मिळवावं.

असा हा मुक्तीद्वाराचा सहजयोग आहे. त्यात तुम्ही आलात. तेव्हा स्वत:ला फार विशेष समजलं पाहिजे. स्वत:चा फार आदर केला पाहिजे. त्या आदरामध्ये तुम्ही आपली वाढ करून घेतली पाहिजे. खरोखर म्हणजे सहजयोगामध्ये कोणताही त्याग करावा लागत नाही. म्हणजे तुम्ही बुद्धीचा त्याग केला तर त्याला आम्ही काही करू शकत नाही. पण ह्याच्यात काही त्यागमूर्ती वगैरे लोक नकोत. उलट ह्याच्यात लाभच लाभ आहे. प्रत्येकाला लाभ होतो. पण त्याला भुरळ आहे. त्या भुरळीत पडलं नाही पाहिजे. अनेक लाभ होतात. लक्ष्मीचा लाभ होईल तुम्हाला. प्रकृतीचा लाभ होईल. तऱ्हेतऱ्हेचे लाभ होतील. पण ती एक भुरळ आहे. त्याच्या पलीकडे आत्मा आहे. तो मिळवला पाहिजे आणि त्यात रममाण झालं पाहिजे. हे मी आज स्पष्टपणाने आपल्याला सांगते आहे आणि सगळ्यांनी सर्व ह्या धर्माच्या आणि ह्या धर्मांधतेच्या ज्या गोष्टी आहेत त्या सोडल्या पाहिजेत. तसंच नास्तिकांनीसुद्धा जरासं डोकं उघडून बघितलं पाहिजे, की परमेश्वर आहे किंवा नाही. उगीचच 'परमेश्वर नाही' असं ठासून सांगायचा त्यांना काही अधिकार नाही. ते कोण आहेत असं म्हणणारे? आणि ते जर असं म्हणतात तर ते अगदी चुकीचं आहे. कारण त्यांनी अजून पाहिलंच नाही, की परमेश्वर आहे किंवा नाही. तेव्हा विशुद्ध स्वरूप असायला पाहिजे. स्वत:चे स्वरूप अगदी निर्मळ करून घ्यायचे आणि त्या विशुद्ध स्वरूपामध्ये परमेश्वराचे आपण आकलन केले पाहिजे. त्याशिवाय ते आकलन होणार नाही. ते तादात्म्य येणार नाही आणि काहीही लाभ होणार नाही. उगीचच जशा आपण पंढरीच्या वाऱ्या करतो, तशा इथे वाऱ्या करू नये. काहीतरी मिळवावं अशी सर्वांना विनंती आहे माझी. अत्यंत कळकळीची विनंती आहे. आणि मी हेच बघते, की महाराष्ट्रात इतकी मेहनत करूनसुद्धा सहजयोग का रूजत नाही. कारण फक्त माझी पूजा करून काही होणार नाही. काय उपयोगाचे आहे? तुम्ही सगळ्या देवळात करत असता माझी पूजा. इथे नुसती पूजा करून काही उपयोगाचे नाही. आज निश्चय आणि निर्धार करायला पाहिजे, की आम्ही ही सगळी थोतांड बाजूला सारून माताजींची पूजा करू. स्वत:ला स्वच्छ करून आज आम्ही माताजींची पूजा करतोय. तेव्हा तरी काही फायदा होईल. नाहीतर मलाच त्रास होतोय ह्या सर्व पूजेचा. हा अधिकार फार मोठा आहे आणि तो जरी आम्ही तुम्हाला दिला, तरी त्याची लायकी तुम्ही मिळवायला पाहिजे.

सगळ्यांना माझा अनंत आशीर्वाद आहे. कृपा करून आपल्याकडे लक्ष द्या. आपलं महत्त्व जाणा. आपलं मोठेपण जाणा. आज कोणत्या कार्याला तुम्ही लागलेत! हे विश्वाचं एवढे मोठे क्रांतीचे कार्य आम्ही काढलेले आहे. त्यात तुम्ही उभे आहात आणि त्यासाठी तुम्ही सज्ज असायला पाहिजे. स्वत:ची मजबुती पाहिजे. तयारी पाहिजे.



विश्वात प्रेमाची शक्ती ही अत्यंत प्रगल्भ शक्ती आहे. प्रेमाची शक्ती ही अत्यंत प्रभावशाली आहे. प्रेमात आपल्याला कष्ट जरी पडले तरी ते आपल्या शक्तीमुळेच पडतात ना की आपल्या दुर्बलतेमुळे.

प.पू.श्रीमाताजी, मुंबई, २८/८/१९७३


✦ प्रकाशक ✦

**निर्मल ट्रान्सफॉर्मेशन प्रा. लि.**

प्लॉट नं.१०, भाग्यचिंतामणी हौसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८.

फोन : ०२०-६५२२६०३१, ६५२२६०३२, e-mail : sale@nitl.co.in, website : www.nitl.co.in

आपल्या भारताची सर्व दुर्दशा संपून इथे रामराज्य येणार आहे. सांगायचं म्हणून सांगितलं नाही. मला जे दिसतं आहे ते मी सांगितलेलं आहे. त्यासाठी सर्व सहजयोग्यांनी मेहनत घ्यायला पाहिजे. त्या मेहनतीशिवाय हे कार्य सिद्ध होणार नाही. इतकं महान कार्य आजपर्यंत कोणत्याही आध्यात्मिक पातळीवर झालं नाही आणि झालंही असलं तरी ते इतकं समाजापर्यंत पोहोचलेलं नाही.

प.पू.श्री माताजी, ८/१२/१९८८

